An International Peer Reviewed & Referred

INTERNATIONAL JOURNAL
OF EDUCATIONAL RESEARCH STUDIES

# शिक्षक शिक्षणातील नवप्रवाह


**प्रा.साळवे व्ही.एस.**

*शिक्षणशास्त्र महाविदयालय, सोनई.*

---

मानवाच्या इतिहासामध्ये कधीही नाही इतक्या मोठया प्रमाणात नव्या पिढीला प्रचंड प्रमाणात बदलणा-या परिस्थीला सामोरे जावे लागत आहे.अशा या बदलांचा जगातील सर्वच लोकांच्या जीवनावर परिणाम घडून येत आहे.सध्या अस्तिवात असलेली शिक्षण पदधतीही  औदयोगिक क्रांतीचे अपत्य आहे.परंतू प्रंचड प्रमाणात होत असलेल्या बदलामुळे शिक्षण पदधती ही बदलत चाललेली आहे.बदलत्या शिक्षण पदधतीमुळे अंतर ,वेळ यांची मर्यादा दुर झाली राष्ट्रे जवळ आली.त्यामधून विविध स्तरावर विदयार्थी शिक्षक संस्था विदयापीठे यांच्यात सांमजस्य करार होवून ज्ञानाची आदान प्रदान वाढली,सहकार्याची भुमिका वाढली.या स्पर्धेमुळे विदयार्थ्यांच्या शिक्षणाच्या दर्जा मध्ये सुधारणा होण्यास चालना मिळाली. शिक्षणात तंत्रज्ञान व व्यवस्थापनात आमुलाग्र बदल होण्यास मदत झाली.यामुळे स्थळ काळाच्या अडचणी वर तंत्रज्ञान उपयुक्त ठरू लागले.विविध संशोधनातुन अध्ययन अध्यापनामध्ये संमिश्र अध्ययन,प्लिप्ड वर्ग,विमर्शी अध्यापन,जर्क तंत्रज्ञान ,ऑन लाईन अध्ययन,दुरशिक्षण इ.नवीन प्रवाह आलेले आहे. प्रस्तुत शोधनिंबधामध्ये संशोधकाने एका नवप्रवाहांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**शिक्षणातील नवप्रवाह**



- **संमीश्र अध्ययन [Blended learning / mix learning]**

आजच्या शिक्षण पदधतीमध्ये जसाजसा शिक्षनाचा स्तर आणि दर्जा उंचावत आहे तसतसे शिक्षणही महाग होत आहे.त्यामुळे सर्वांनाच चांगल्या दर्जाच्या शिक्षनाचा लाभ घेता येत नाही. संमीश्र अध्ययन सर्वच स्तरावरील नागरीकांना या शिक्षणाचा लाभ मिळेल म्हणून संमीश्र अध्ययन ही काळाची गरज ठरली आहे.अध्ययन अध्यापनात संगणकाचा व इंटरनेटचा मोठया प्रमाणावर वापर होताना दिसतोय.संगणकाचा व इंटरनेटचा एकत्रीकरण केल्यास मोठया प्रमाणावर फायदा मिळविता येणे शक्य आहे.या विचारातुन संमीश्र अध्ययन ही संकल्पना पुढे आलेली आहे.

- **व्याख्या :-**

१.Blended learning is defined as a integraion of online learning with traditional face to face class activities in a planed pedagogically valuable manner.

२. ऑनलाईन अध्ययनाचे पांरपारिक अध्ययन अध्यापन प्रक्रियेच्या वर्गातील कृतीसाठी नियोजन बध्द व अध्यापनशास्त्राच्या दृष्टीने महत्वपुर्ण असे केलेले एकात्मीकरण म्हणजे संमीश्र अध्ययन होय.

३. Blended larning is a centred approach that integrater learning experiences of online and face to face environment thoughtfully.

४.ऑनलाईन आणि समोरासमोरच्या अध्ययन परिस्थितीसाठीच्या अध्ययन अनुभवांचे विचारपूर्वक एकात्मीकरण करणारा विदयार्थी केंद्री दृष्टीकोन म्हणजे संमीश्र अध्ययन होय.

वरील सर्व व्याख्यांचा विचार करता संमीश्र अध्ययनासाठी पांरपारिक अध्ययन पध्दती व संमीश्र अध्ययन पध्दतीचे व्यवस्थित अर्थपुर्ण एकात्मिकीकरण करणे आवश्यक आहे. संमीश्र अध्ययन पदधती ही पांरपारिक अध्ययनामध्ये एकजीव होणे आवश्यक आहे.या अध्यापनामध्ये विदयार्थ्यांच्या कृतीला वाव देवून विदयार्थ्यांना सतत कृतीशील ठेवणे अपेक्षित आहे.

यापुढे शिक्षकांनी वर्गात विदयार्थ्यांचे अध्ययन अनुभव वाढविण्यासाठी नवनवीन सोशल नेटवर्किंगचे ॲप्लीकेशन समावेश करण्यावर संमीश्र अध्यायनात भर दिलेला आहे. यात व्हिडीओ कॉन्फसरिंग ,चॅट रुम,न्युज फोरम,इ मेल,व्हॉटस्ॲप, फेसबुक,मोडयुल.इ विचार करणे आवश्यक आहे.

- **संमीश्र अध्ययनासाठी आवश्यकता.**

  १. आशयाला अनुसरुन ऑनलाईन अध्ययनाची निवड करणे.

  २. योग्य संसाधनाचा वापर करणे .

  ३. शाळेला आवशयक असणा-या साधनांची जमवाजमव करणे व प्रशिक्षकाची नेमणुक करणे.

  ४. शाळेमध्ये वातावरण निर्मिती करणे.

  ५. विदयार्थ्यांना व शिक्षकांना योग्य प्रशिक्षण देणे.

- **संमीश्र अध्ययनासाठी सुयोग्य नियोजन :-**

  संमीश्र अध्ययनाच्या सुयोग्य वापरासाठी विचारपुर्वक नियोजन,विदयार्थ्यांच्या गरजा व व्यापक दृष्टीकोनाची आवश्यकता असते.

  १. विदयार्थ्यांना कोणते कौशल्ये किंवा ज्ञानाची आवशयकता आहे याचा विचार करावा लागेल.

  २. योग्य घटक व उपघटकांचा विचार

  ३. योग्य आशयाची निवड करणे व त्यानुसार साधनाची उपलब्धतेची शाश्वती देणे.

  ४. योग्य मार्गाची निवढ करणे.

  ५. योग्य वातावरण निर्मिती करणे.

  ६. शिक्षकाकडून कोणत्या प्रकारचे सहाय्य हवे आहे याचे योग्य नियोजन करणे.

  ७. सातत्यपुर्ण सर्वंकष मूल्यमापनाची सोय योग्य त्या ठिकाणी करणे.

- **संमीश्र अध्ययनाचे फायदे :-**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या स्पर्धात्मक व गतिमान युगामध्ये स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी संमीश्र अध्ययन ही एक मुलभूत गरज आहे.

१. अभ्याक्रमाचे ध्येय व उदिदष्टे परिणामकारक साध्य करता येतात.वैयक्तिक अध्ययन कृतींचा समावेश करण्याची संधी मिळते.

२. शिक्षक व विदयार्थी आंतरक्रिया वाढते तसेच त्यांच्यामधील परस्पर संबध दृढ होण्यास मदत होते.

३. विदयार्थी सहभाग वाढून तो सतत व्यस्त राहण्यास मदत होते.

४. विदयार्थी स्वत:चे कार्य योग्य पध्दतीने पुर्ण करतो.

५. विदयार्थ्यांच्या अध्ययनात प्रगती होते.विदयार्थ्यांच्या चिकित्सक विचार ,समस्या विमोचन आणि सैध्दातिक भागाचे वास्तव इ.कौशल्यांचा विकास होतो.

६.शिक्षकांचा दृष्टीकोन बदलण्यास या संमीश्र अध्ययनामुळे फार मोठी मदत होते.

७.विदयार्थ्यांना सतत शिक्षकांच्या व इतर विदयार्थ्यांच्या संपर्कात राहावे लागते.

८.माहितीचे आदान प्रदान करण्यामुळे तसेच सतत संपर्कात राहावे लागत असल्यामुळे विदयार्थ्यांच्या तंत्रज्ञान वापरण्याच्या कौशल्यात वाढ होते.

९.काही विदयार्थी समोरासमोर स्वत:चे मत मांडण्यास असमर्थ असल्यामुळे ऑनलाईन पदधतीमुळे ते विदयार्थी न घाबरता आपले मत मांडू शकतात.त्यामुळे असे विदयार्थी शिक्षणाच्या मुळ प्रवाहात येतात.त्यांची भिती नष्ट होवून त्यांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.

- **संमीश्र अध्ययनाच्या मर्यादा :-**

१. निश्चीत अशा वर्गाध्यापनाची व ऑनलाईन अध्ययनाची संरचना नाही.

२. उच्चप्रतीची स्वयंशिस्त व स्वनिर्देशनाची आवशयकता असते.ज्या विदयार्थ्याकडे ती नसते ते अध्ययनात मागे पडतात.

३. पोषक वातावरण प्रत्येकाकडे उपलब्ध असेलच असे नाही.

४. तंत्रज्ञान वापरात अनेक अडचणी येत असतात.

५. विदयार्थ्यांचा टाईमपास होण्याची शक्यत असते.

६. विदयार्थ्यांना चुकीचे मार्गदर्शन मिळाले तर विदयार्थ्यांचा मार्ग भरकटण्याची शक्यता नाकरता येत नाही.

- **समारोप :-**

तंत्रज्ञानाची प्रगती झाली तसतशी अध्ययन अध्यापन प्रक्रिया त्याने प्रभावित केली आहे.भारतामध्ये शिक्षण प्रक्रियेला मोठया प्रमाणात सामारे जावे लागत आहे त्यावरील एक ठोस उपाय म्हणजे या नवप्रवाहांचा वापर मोठया प्रमाणात करावा लागणार आहे.संमीश्र अध्यापन एक महत्वाचा उपाय आहे.